# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक : - २९ जून २०२४

---

जळगाव दि.२९ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने दि. १ ते ७ जुलै या कालावधीत विद्यापीठस्तरीय कुलगुरु उन्हाळी शिबीराचे (सृष्टी सवंर्धन-२०२४) आयोजन करण्यात आले आहे.

जळगाव,धुळे,नंदुरबार या जिल्ह्यातील २०० रासेयो स्वयंसेवक यामध्ये सहभागी होणार आहेत. या शिबीरात जलसंवर्धन नियोजन, आरोग्य मित्र तयार करणे, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार रासेयो स्वयंसेवकांमध्ये कौशल्ये विकसित करणे, बंधारे तयार करणे, वन्यजीव संवर्धन, जैवविविधता, जलसंधारण, प्लास्टिक मुक्ती, डीजीटल साक्षरता हे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. याशिवाया विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासासदंर्भात तज्ज्ञ व्यक्तींचे व्याख्यान होणार आहे. सोमवार दि. १ जुलै रोजी जळगावचे उपवनसंरक्षक इंजी. प्रवीण ए. यांच्या हस्ते या शिबीराचे उद्घाटन होणार आहे.कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी अध्यक्ष राहणार असून यावेळी प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे उपस्थित राहतील. याशिवाय व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड . अमोल पाटील, नितीन झाल्टे, अधिसभा सदस्य प्रा. संदीप नेरकर, प्रा.विशाल पराते, स्वप्नाली काळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. दि. २ जुलै रोजी केंद्रशासनाचे प्रतिनिधी क्षेत्रीय संचालक अजय शिंदे हे माय भारत पोर्टल या विषयावर संवाद साधतील. दि. ३ जुलै रोजी वृक्ष दिंडी काढुन वृक्षारोपण करण्यात येणार आहे. अशी माहिती रासेयो संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी दिली.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.२९ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या गणित शास्त्र प्रशाळेत सांख्यिकी विभागाच्या वतीने राष्ट्रीय सांख्यिकी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विभाग प्रमुख प्रा.आर.एल.शिंदे यांचे मुख्य व्याख्यान झाले.

सुप्रसिध्द सांख्यिकी तज्ज्ञ प्रा.प्रशांतचंद्र महालनोबिस यांची जयंती राष्ट्रीय सांख्यिकी दिन म्हणून साजरी केली जाते. यावर्षी “निर्णय घेण्यासाठी डेटाचा वापर” अशी या दिनाची थिम होती. प्रा.आर.एल. शिंदे यांनी राष्ट्रनिर्माणात सांख्यिकीच्या सामाजिक-आर्थिक नियोजनाच्या अंगाने महत्व सांगितले. प्रा.मनोज पाटील यांनी भारतीय संख्या शास्त्रज्ञ याविषयी माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी दुसऱ्या सत्रात त्यांचे प्रकल्प, नोकरी-प्रशिक्षण अनुभव आदिंचे विविध पैलू सांगितले. ऑनलाईन सांख्यिकी प्रश्नमंजुषा यावेळी घेण्यात आली. प्रशाळेचे संचालक प्रा.एस.आर.चौधरी, गणित विभाग प्रमुख प्रा. के.एफ पवार, प्रा.एच.एल.तीडके, यावेळी उपस्थित होते. प्रा. मनोज पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ.रोहन कोष्टी यांनी आभार मानले.

**बातमी क्र.३**

# धुळयात विद्यापीठातर्फे आयोजित विद्यार्थी-पालक कार्यशाळेला उत्तम प्रतिसाद

जळगाव दि.२९ (प्रतिनिधी) : नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत कवयित्री बहिणबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या प्रशाळामध्ये सुरू झालेल्या नवीन पदवी अभ्यासक्रमांची माहिती देण्यासाठी शनिवारी धुळे येथील एम.डी.पालेशा महाविद्यालयात घेण्यात आलेल्या “विद्यार्थी-पालक” कार्यशाळेला चांगला प्रतिसाद लाभला. या कार्यशाळेत विद्यार्थी व पालकांनी सहभागी होऊन या अभ्यासक्रमांची व भविष्यातील करीअरच्या संधीची माहिती घेतली.

विद्यापीठाने या वर्षी प्रथमच अशा प्रकारची पालक व विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा आयोजित केली होती. विद्यापीठात व्यवस्थापन शास्त्र प्रशाळेत बी.कॉम. (बीएफएसआय), भौतिकशास्त्र प्रशाळेत बी.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स) हे दोन नाविन्यपुर्ण चार वर्षीय पदवी अभ्यासक्रम सुरु होत आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांर्तगत हे सर्व अभ्यासक्रम सुरु आहेत. त्याची माहिती या कार्यशाळेत देण्यात आली.

यावेळी मंचावर प्र-कुलगुरू प्रा. एस.टी.इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.शिवाजी पाटील, अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, धुळे एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष रवींद्र बेलपाठक, सचिव संतोष अग्रवाल यांची प्रमुख उपस्थिती होती. प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे यांनी यावेळी विद्यापीठातील अभ्यासक्रम, सोयीसुविधा, विद्यापीठाची वाटचाल याविषयी सविस्तर माहिती दिली. प्राचार्य डॉ.प्रभाकर महाले यांनी प्रास्ताविक केले. प्रा.जयदीप साळी यांनी बी.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स) या अभ्यासक्रमाविषयी तर प्रा. रमेश सरदार यांनी बी.कॉम. (बीएफएसआय) या अभ्यासक्रमाचे महत्व व भविष्यातील संधी याविषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या शंकांचे यावेळी निरसन करण्यात आले. प्रा.बी.एस.काळे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. डॉ. हेमंत जोशी यांनी आभार मानले. यावेळी धुळे शहर व परिसरातील विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, तसेच प्राधिकरणांचे सदस्य यांची उपस्थिती होती.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

डॉ.सुनील पाटील

जनसंपर्क अधिकारी